## स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न...

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणकि विकासासाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा -जिल्हाधिकारी पवनीत कौर




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नव्याने सुरु केलेल्या सी.बी.सी.एस. अभ्यासक्रम प्रणालीनुसार विद्यार्थ्यांसाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा आहे. खूप चांगला हा कार्यक्रम असून यामुळे विद्यार्थ्यांना ते ज्या महाविद्यालयात प्रवेश घेत आहेत, त्या महाविद्यालयाची, तेथील शैक्षणिक कार्याची ओळख होईल. त्यांना चांगल्या शैक्षणिक वातावरणामध्ये शिकण्याकरिता प्रोत्साहन मिळेल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी इन्डक्शन प्रोग्राम महत्वाचा असल्याचे अमरावतीच्या जिल्हाधिकारी श्रीमती पवनीत कौर यांनी सांगितले. विद्यापीठातील अधिसभागृहात पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांकरिता आयोजित करण्यात आलेल्या स्टुडंट इन्डक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी त्या आभासी पद्धतीने मार्गदर्शन करतांना बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरूडॉ. दिलीप मालखेडे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, ह.व्या.प्र. मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षणाच्या संधीचं सोनं करावं - प्रधान सचिव डॉ. रस्तोगी





बारावीनंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची संधी प्राप्त होत असून त्या संधीचं सोनं करावं, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकास चंद रस्तोगी यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने सी.बी.सी.एस. प्रणालीनुसार लागू झालेल्या अभ्यासक्रमांतर्गत इन्डक्शन कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. पाचही जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी इन्डक्शन कार्यक्रम सात दिवस आयोजित केला आहे. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

# ज्ञानार्जन करणे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील आनंदाचा भाग बनवावा - विभागीय आयुक्त डॉ. पांढरपट्टे



यशस्वी होणं म्हणजे मनासारखं आयुष्य जगणं असुन विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतांना आनंद मिळविला पाहिजे. ज्ञानार्जन करणे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील आनंदाचा भाग बनवावा, असे प्रतिपादन अमरावती विभागाचे आयुक्त डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये स्टुडन्ट इन्डक्शन प्रोग्रामअंतर्गत पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांशी आभाशी पध्दतीने संवाद साधतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ.दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरु डॉ.विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख , ह.व्या.प्र. मंडळ अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी.मराठे व विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ.राजीव बोरकर उपस्थित होते.

# इन्नोव्हेशनची पहिली पायरी बेंचमार्कींग - श्री संजय जाधव
# विद्यापीठात पाचव्या दिवशी दीक्षारंभ कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन



जग झपाट्याने बदलत आहे. दररोज सर्वच क्षेत्रात बदल होत असून होणाया बदलाला सामोरे जाण्याचा आणि त्यानुरुप स्वत:मध्ये बदल करण्याची सद्यस्थिती आहे. नवनवीन तंत्रज्ञान येत आहे, तद्वतच मोठ्या प्रमाणावर इन्नोव्हेशन होत असून इन्नोव्हेशनची पहिली पायरी बेंचमार्कींग असल्याचे प्रतिपादन जाधव गृप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध उद्योजक श्री संजय जाधव यांनी केले. विद्यापीठ अधिसभागृहात पाचव्या दिवशी दीक्षारंभ कार्यक्रमाप्रसंगी पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, तुळशीराम गायकवाड अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूरचे प्राचार्य डॉ. प्रशांत कडू उपस्थित होते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रीत - युजीसी सचिव प्रो. रजनीश जैन, अभिक्रम प्रक्रिया कार्यक्रमप्रसंगी मार्गदर्शन





केंद्र शासनाने लागू केलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रीत असून शैक्षणिक क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल व परिवर्तन करणारे असल्याचे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीचे सचिव प्रो. रजनीश जैन यांनी केले. विद्यापीठ अधिसभागृहात पाचही जिल्ह्यांतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित अभिक्रम प्रक्रिया कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, डॉ. कुमोदिनी क्षीरसागर व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

## प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला




महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदी संतांनी महाराष्ट्राच्या सामाजिक ,आध्यात्मिक व साहित्य क्षेत्रामध्ये अमूल्य योगदान दिले आहे. या संत परंपरेतील एक दैदीप्यमान व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज खयाअर्थाने समन्वयमहर्षी आहेत, असे प्रतिपादन डॉ. नयनाताई कडून यांनी केले, त्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व. वासुदेवराव राजारामजी देशमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून आयोजित प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमालेत समन्वयमहर्षी संत श्री गुलाबराव महाराज या विषयावर मांडणी करतांना बोलत होत्या, त्यावेळी व्यासपीठावर माजीमंत्री श्री बच्चुभाऊ कडू, अध्यक्षस्थानी श्री विद्याभारती शैक्षणिक मंडळ, अमरावतीचे सचिव डॉ. अशोक चौहान, दानदात्यांतर्फे प्रतिनिधी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा एस. येनकर व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अरूण चौहान उपस्थित होते.